भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. १५३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २५/०३/२०१८

**१) टिंबक सिंचनाचे लॅटरला आग लावुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद:—**

दिनाक २३/०३/२०१८ चे १०.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी केशवराव सुकाजी गायकवाड वय ५८ वर्ष रा. पळसगाव सोनका याचे मालकीचे शेतातील ४ एकर उसाचे घोडक्याला व २०५ एकराला लावलेल्या टिंबक सिंचनाचे लॅटर ला कोणीतरी अज्ञात आरोपीने आग लावुन एकुण १,२०,०००/रु. चा नुकसान केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४३५ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चांदेवार पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**२) ट्रक चालकाने एसटी बसला धडक देवुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद:—**

दिंनाक २४/०३/२०१८ चे १८.०० ते १८.१५ वाजता यातील एसटी बस क्र.एमएच ४०एन ८४९१ ही करडी वरून भंडारा कडे येत असता, कारधा बसस्थानक समोर रोडवर उभे असतांना समोरून येणा—या यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक निष्काळजीपणे चालवुन काटत असतांना एसटीबसचे ड्रायव्हर साईडला धडक दिली त्यामुळे इंडीकेटर, बफ्फर चेपकवुन २,०००/रु. चे नुकसान केल्याने व बस मधील कोणीही प्रवासी जखमी न झाल्याने फिर्यादी रामभाऊ नामदेव रेहपाडे वय ५२ वर्ष रा. वार्ड क्र. ०१ अडयाळ यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंगाडे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**३) उपविभागीय दंडाधीकारी साहेब तुमसर यांचे आदेशाचे उल्लंघन करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद:—**

दिंनाक २४/०३/२०१८ ते १९.१५ ते २०.०० वाजता यातील आरोपी हा मा. उपविभागीय दंडाधीकारी तुमसर यांचे आदेश क्र. ०६/१६ कलम ५६ मपोका. अन्वये सदर आरोपीस दि. ०१/०६/२०१७ अन्वये जिल्हयातुन २ वर्षा करीता हद्दपार करण्यात आले असतांना सुध्दा तडीपार आदेशाचे उल्लंघन करतांनी मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोउपनी. उबाळे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १४२ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. उबाळे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) आमरोड वर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २४/०३/२०१८ चे १७.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हा चिचोली बसस्थानक येथे आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशी उभी करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. मोदनकर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मोदनकर पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**५) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक २४/०३/२०१८ चे १९.१० वाजता. दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही पोस्ट ऑफीस चौक भंडारा येथे दारुचे नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन व्दारे चेक केले असता, अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने व वैदयकीय रिपोर्ट वरून सरतर्फे फिर्यादी सफौ. फंदे वानिशा भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पोना. साबळे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**६) तलावाचे पाण्यात बुडुन तरूणाचा मृत्यु:—**

दिनांक २४/०३/२०१८ चे ११.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी बबन किशन शिवरकर वय ६१ वर्ष रा. सानगडी यांचा मुलगा मृतक अनमोल बबन शिवरकर वय २५ वर्ष रा. सानगडी हा तलावाच्या पाण्यात आंगोळ करण्याकरीता गेला असता, तलावाचे पाण्यात बुडुन मरण पावल्याने, फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली पुढील तपास पोहवा. मेश्राम पोलीस स्टेशन साकोली करीत आहेत.

७) **औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु:--**

दिनाक ११/०३/२०१८ चे १४.०० वाजता दरम्यान यातील मृतक अरवींद सखाराम पिसे वय ५३ वर्ष रा. केसलापुर जि. नागपुर हा त्याचे मोटार सायकलने दि. ११/०३/२०१८ चे १४.०० वाजता दरम्यान मौदा वरून भंडारा कडे जात असतांना हायवे रोडवर खरबी येथील राईस मिल जवळ गाडी स्लिप होवुन पडल्याने, त्याचे डोक्याला मार लागुन गंभिर जखमी झाल्याने, त्यास औषधोपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दि. ११/०३/२०१८ चे १६.३० वाजता मरण पावल्याने, पो. स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागद पत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. लांजेवार यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर पुढील तपास सफौ. कांबळे पोलीस स्टेशन पोलीस स्टेशन जवाहरनगर करीत आहेत.

८) **वैनगंगा नदीचे पात्रात इसमाचे प्रेत मिळुन आल्याने मर्ग नोंद:--**

दिंनाक २४/०३/२०१८ चे १०.४० वाजता दरम्यान यातील अज्ञात मृतक भिमराव झिंनकुजी रामटेके वय ६० वर्ष रा. पिंडकेपर साकोली हा वैनगंगा नदीचे पात्रात तरंगतांनी मिळुन आल्याने, त्यास तपासनी करीता सामान्य रूग्नालय भंडारा येथे नेले असता, वैदयकीय अधीकारी यांनी तपासुन मृत असल्याचे सांगीतले मृतक याचा मृत्यु पाण्यात बुडुन झाल्याचे प्रथम दर्शनी दिसुन येत असुन, मरणाचे निश्चीत कारण माहीत होण्याकरीता सरतर्फे फिर्यादी पोउपनी. चेके यांचे लेखी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करून तपासात घेतला पुढील तपास पोहवा. चोपकर पोलीस स्टेशन भंडारा करीत आहेत.

९) **अवैध दारु/ जुगार अडड्यांवर धाडी . :--**

दिनांक २४/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन कारधा,अडयाळ, गोबरवाही, व वरठी येथे अवैध दारु/ जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १७ लिटर हातभट्टी दारु किंमती १,३००/--रु. व ३ लिटर ६० मिलीलीटर देशी दारू किमती ८८४/रु. तसेच जुगारातुन किंमती ८८/--रु. असा एकुण किंमती २,२७२/--रु. चा माल जप्त करण्यात आला.

१०) **मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :--**

दिनांक २४/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०१ त्यापैकी तीन सिटर वाहनाकरीता ०६ ईतर वाहनांवरती -- १०१ केसेस करण्यात आले आहे.

**(मपोउपनि.प्रणती लांजेवार)**
**महिती कक्ष भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.